Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 355 – 359

DOI: 10.5281/zenodo.10128786

Original Research Article

# महात्मा गांधीचे लघु व कुटीर उद्योगांविषयी विचार

प्रा. नंदा संतुकराव चारलवाड

संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, स्वातंत्र्य सैनिक सुर्याभानजी पवार महाविद्यालय पूर्णा, जि. परभणी ४३१५११ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: nandamahavm@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

सध्या आपण महात्मा गांधीजींची 154 वी जयंती साजरी केली आहे. त्यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 रोजी गुजरात राज्यातील पोरबंदर येथे झाला. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी ठेवणारे महात्मा गांधी हे खरे देशभक्त समाज सुधारक, सामाजिक, आर्थिक, तात्विक, आणि अध्यात्मिक, मानवतावादी दृष्टिकोनाने ओत प्रोत होते. महात्मा गांधी हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख नेते व तत्वज्ञ होते तसेच ते सत्याग्रहाचे जनक व अहिंसेचे पुजारी म्हणून ओळखले जातात. त्यांची जयंती ही जगभरात “आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन” म्हणून साजरी केली जाते. महात्मा गांधींनी आपल्या लेखनाच्या माध्यमातून सामाजिक व आर्थिक विचार मांडून समाजाला जागृत करण्याचे काम केले जेव्हा आपण त्यांच्या आर्थिक विचारांकडे पाहतो तेव्हा आपल्याला देशाच्या आर्थिक समस्या जसे गरिबी, बेरोजगारी, उपासमारी, आर्थिक विषमता तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने भांडवलशाहीला विरोध यासारख्या अनेक घटकांचा स्पष्ट उल्लेख केलेला दिसून येतो.

प्रस्तुत लेखात महात्मा गांधीचे लघु व कुटीर उद्योगासंबंधी विचार काय होते आणि आज सुद्धा त्यांनी मांडलेले विचार भारतीय अर्थव्यवस्थेसाठी किती महत्त्वाचे आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

## संशोधनाचे उद्दिष्टे

१. महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार अभ्यासणे.

२. महात्मा गांधी यांचा ग्रामीण विकास दृष्टिकोन अभ्यासणे.

३. महात्मा गांधी यांचे लघु व कुटीर उद्योगांविषयी विचार अभ्यासणे.

४. सांप्रत स्थितीत गांधीजीचे विचार ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक आहेत हे पाहणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधातील सर्व माहिती दुय्यम स्त्रोतावर आधारित असून यासाठी क्रमिक पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे व इंटरनेटवरील माहितीचा आधार घेतला आहे.

**लघु व कुटीर उद्योगांबद्दल महात्मा गांधीजींचे विचार**

गांधीजींचा आर्थिक दृष्टिकोन त्या काळाच्या स्थितीचे वर्णन करते ज्यावेळेस भारत देश ब्रिटिश राजवटीचा गुलाम होता आणि देशासमोर अनेक प्रकारच्या समस्या होत्या उपासमार, बेरोजगारी, गरीबी या समस्यांनी देश जखडला गेला होता. ब्रिटिश राजवटीमुळे आपली ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे नष्ट झाली होती. ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योग नष्ट होऊन लोकांवर उपासमारीची वेळ आली होती. कधी काळी स्वयंपूर्ण असणारी खेडी आज ओसाड झाली आहेत. ग्रामीण भागातील लोक रोजगाराच्या शोधात शहरी भागाकडे स्थलांतर करत आहेत. त्यामुळे संपत्तीचे, उत्पादनाचे केंद्रीकरण होऊन देशात आर्थिक विषमता प्रचंड प्रमाणात वाढताना दिसत आहे. ग्रामीण भागातील बेरोजगारी दूर करण्यासाठी उत्पादनाचे केंद्रीकरण थांबवण्यासाठी महात्मा गांधीजींनी लघु कुटीर उद्योगांचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे असे मत मांडले.

भारत हा खेड्यांचा देश आहे. सन 2011 च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी 68.84% म्हणजे 83 कोटीहून अधिक लोक 06, 49, 481 गावांमध्ये राहतात. गांधीजींच्या हयातीत देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी किंवा इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1947 मध्ये देशात खेड्यांची संख्या 06,49,481 यापेक्षा जास्त होती. खेडी ही केवळ देशाच्या सामाजिक जडणघडणीचे आधार नाही तर भारताच्या विकासभिमुख आणि समन्वय साधणाऱ्या संस्कृतीचे आणि त्या सांस्कृतिक मूल्यांचे रक्षक आहेत. जे विविधतेतून एकतेचे सूत्र पेरतात आणि देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यास अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. हे महात्मा गांधीनी जाणले होते. म्हणूनच गांधीजी म्हणतात की देशाचा विकास घडवून आणायचा तर अगोदर ग्रामीण भागाला आर्थिक दृष्ट्या मजबूत बनवलं पाहिजे कारण, खरा भारत हा ग्रामीण भागातच वसलेला आहे, म्हणून त्यांनी "खेड्याकडे चला" असा संदेश दिला त्यांनी खेड्याची कायापालट करण्यासाठी ग्रामस्वराज्य या संकल्पनेवर भर दिला. जोपर्यंत आपण ग्रामीण भागाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी सत्तेचा अधिकार प्रदान करणार नाहीत, तोपर्यंत देशाचा खरा विकास असंभव आहे. या हेतूनेच त्यांनी पंचायती राज सारख्या तत्त्वावर भर दिला त्याचबरोबर खेड्यांचा आर्थिक विकास आणि बेरोजगारी सारख्या समस्यांचे उच्चाटन करण्यासाठी लघु व कुटीर उद्योगांचे महत्त्व स्पष्ट केले.

महात्मा गांधीजींच्या मते देशातील म्हणजेच ग्रामीण भागातील आर्थिक विकास व बेरोजगारीची समस्या दूर करण्यासाठी कृषी क्षेत्राबरोबरच दुसरे महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग होत. हे उद्योग हे एकमेव माध्यम आहेत ज्यामध्ये कमी भांडवल गुंतवणूक करूनच प्रादेशिक स्तरावर उपलब्ध संसाधनासह उपक्रम सुरू केले जाऊ शकतात आणि स्वयंरोजगार आणि रोजगार या दोन्हीच्या संधी निर्माण केल्या जाऊ शकतात. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंब हे उद्योग सहजतेने उभे करून आपली उपजीविका भागू शकतात, आर्थिक समस्या सोडू शकतात. गांधीजींनी देशाची आर्थिक स्थिती खूपच जवळून जाणली होती, म्हणूनच भारतीय अर्थव्यवस्थेसाठी एक महत्त्वपूर्ण उपयोगी प्रारूप लघु व कुटीर उद्योगांच्या रूपाने प्रस्तुत केले होते.

गांधीजींच्या मते, भारताची जलद गतीने वाढणारी लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर बेरोजगारीच्या समस्येला उत्पन्न करू शकते. आणि देशाला या समस्येला तोंड द्यायचे तर लघु व कुटीर उद्योगांना महत्त्व द्यावे लागेल कारण हे उद्योग यंत्राच्या जागी कामगारांना अधिक महत्त्व देतात की जे बेरोजगारी दूर करण्याच्या दृष्टीने एक चांगला उपाय होऊ शकतो. लघु व कुटीर उद्योगांमध्ये रोजगार निर्माण करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात आहे.

महात्मा गांधीजींनी मोठ्या उद्योगांना आणि यांत्रिकीकरणाला विरोध केला होता त्यांनी जाणलं होतं की जर देशाने यांत्रिकीकरण, औद्योगिकीकरणावर भर दिला तर देशात असणारी बेरोजगारी आणि गरिबी कधीच दूर होणार नाही. मोठे उद्योग हे एकीकडे यंत्राचा वापर करून बेरोजगारीला जन्म देतात तर दुसरीकडे उत्पादन व संपत्तीच्या केंद्रीकरणाला प्रोत्साहन देतात, ज्यामुळे कामगाराबरोबर देशातील सामान्य जनतेचे ही शोषण होते. भारताच्या या समस्येची तीव्रता सध्या कमी आहे. पण समोर जाऊन या समस्या उग्ररूप धारण करू शकतात म्हणूनच आपल्याला श्रमाचा जास्त वापर तर भांडवली तंत्राचा कमी वापर करण्याची गरज आहे. त्यामुळे आपण ग्रामीण भागाच्या विकासासाठी श्रम आणि शेती या साध्या तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे.

गांधीजींना उद्योगांच्या बाबतीत भारताची पुनर्रचना करायची होती म्हणूनच त्यांनी ज्या गावांमध्ये स्वावलंबनाचे गुण होते त्या गावाचे संघटन केले. ते म्हणाले की, मोठ-मोठ्या उद्योगांवर भर दिला तर देशात मार्केटिंग आणि स्पर्धेचे प्रश्न निर्माण होतील आणि कामगार व ग्रामस्थांचे शोषण होईल. राष्ट्रीय गरजा आणि स्वातंत्र्य ग्रामस्थांच्या गरजांच्या आधारे खेड्यांचा आणि समाजातील निम्न दलित लोकांचा आणि विशेषत: अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी सारख्या गटांचा सामाजिक आर्थिक विकास करणे हा गांधीजींचा मूळ दृष्टिकोन होता.

महात्मा गांधीजींच्या मते आपल्या देशाची लोकसंख्या जास्तीत जास्त असल्यामुळे श्रमशक्ती विपुल आहे त्या ठिकाणी यंत्राचा वापर करून उद्योगांचे केंद्रीकरण करण्याऐवजी विकेंद्रीकरण केलेले असावे लघु व कुटीर उद्योग ग्रामीण भागात, श्रमाच्या साह्याने सुरू केली जावेत. त्यांच्या मते प्राचीन काळात भारतात हस्तकला वस्तू, कापड, ग्रामीण भागातच तयार होत असत. जागतिक क्षेत्रात या वस्तूंना प्रचंड मागणी होती. जगात भारतीय वस्तू श्रेष्ठ समजल्या जात असत. त्या काळात होणारे उत्पादन लहान प्रमाणातच व विकेंद्रीत स्वरूपात होते. जर प्राचीन काळी भारतामध्ये हे शक्य होते तर आजच्या काळात का नसावे. त्यांच्या मते, सामाजिक व उत्पादन संघटनेचा एक भाग म्हणजे विकेंद्रीकरण होय यंत्राद्वारे उत्पादन केले, उत्पादनांचे व उद्योगांचे केंद्रीकरण झाले म्हणजे सर्व गरजांची पूर्तता होते. असे जरी आपण मानले तरी वस्तूंचे वाटप किंवा वितरण करण्यासाठी प्रचंड खर्च करावा लागेल. एवढा प्रचंड खर्च टाळण्यासाठी उद्योगांचे विकेंद्रीकरण केले, उत्पादन केले आणि झालेले उत्पादन आणि वितरण लहान लहान क्षेत्रांमध्ये झाले तर अनेक अडचणी दूर होतील. विकेंद्रीकरणामुळे केंद्रीकरणाचे असलेले दोष टाळता येतील.

महात्मा गांधींनी लघु व कुटीर उद्योगांना महत्त्व देऊन विकेंद्रीत अर्थव्यवस्थेचा पुरस्कार जरी केला असला तरी त्यांचा अवजड व मोठ्या उद्योगांना विरोध होता असे नाही. मोठे किंवा अवजड उद्योग लघु उद्योगांना मारक ठरणार नाही हे पाहणे गरजेचे आहे असे त्यांचे मत होते. त्यांच्या मते सर्व प्रचंड किंवा अवजड उद्योग जसे वीज, वाहतूक, लोखंड आणि पोलाद हे कोणत्याही देशाच्या विकासासाठी अपरिहार्य आहेत. जर असे उद्योग खाजगी लोकांकडे गेले तर कामगार आणि सामान्य जनतेचे शोषण होणे निश्चितच आहे, म्हणून अशा उद्योगांची उभारणी अशा पद्धतीने केली गेली पाहिजे की ज्यात भांडवलशाहीचे दोष दूर झाले पाहिजेत अर्थात अशा उद्योगांवर शासनाचे पूर्णपणे नियंत्रण राहणे गरजेचे आहे.

## महात्मा गांधीचा विकास दृष्टिकोन आणि आजची स्थिती

महात्मा गांधीजींच्या लघु व कुटीर उद्योगासंबंधी विचारांना आपण जेव्हा वर्तमान भारतीय अर्थव्यवस्थेच्या बाबतीत पाहतो तेव्हा स्पष्टरित्या दिसते की, जागतिकीकरण, अपुरे भांडवल, कच्च्या मालाचा तुटवडा, अप्रगत तंत्रज्ञान अशा अनेक समस्यांमुळे लघु व कुटीर उद्योगांच्या अस्तित्व धोक्यात येत आहे सध्याच्या स्थितीत देशाने लघु व कुटीर उद्योगांच्या विकासाच्या दिशेने प्रयत्न केले नाही असे नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून लघु उद्योगांच्या विकासासाठी प्रचंड प्रयत्न केले गेले. देशात कुटीर उद्योग मंडळाची स्थापना 1949 मध्ये झाली आणि पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत त्यांच्या विकासासाठी 42 कोटी रुपये खर्च करण्यात आले त्यानंतर 1956, 1977, 1980 आणि 1991 च्या औद्योगिक धोरणाच्या घोषणांमध्ये लघु व कुटीर उद्योगांना प्रमुख स्थान दिले गेले. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे लघु व कुठे उद्योगांची प्रगती झाली असून देशातील बेरोजगारी दूर करण्यात आणि अर्थव्यवस्थेला सुधारण्यात मोठी मदत झाली आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण 2015-16 नुसार MSME क्षेत्रात सुमारे 633.28 लाख युनिट कार्यरत आहेत आणि या सर्वेक्षणानुसार या युनिट मुळे 1.10 कोटी रोजगार निर्माण झाले आहे. तरीसुद्धा शासनाने अनेक उपाययोजना करूनही आपल्या देशाची लोकसंख्या पाहता या भागातील विकासाचा वेग वाढवण्यात पाहिजे तसे यश मिळाले नाही.

आर्थिक विकासाचा वेग वाढवण्यासाठी शासन सातत्याने उपाययोजना करत आहे. पण जोपर्यंत देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या शाश्वत विकासाचे उद्दिष्टे साध्य होत नाही, तोपर्यंत हे उद्दिष्ट गाठणे शक्य नाही. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा संपूर्ण भार केवळ शेती आणि त्यांच्याशी संबंधित उद्योगांवर न पडता या भागातील लघु व कुटीर उद्योगांच्या विकासावर भर देण्याची गरज आहे. ग्रामीण युवकांना केवळ स्वयंरोजगाराच्या माध्यमातून विविध उपक्रम स्थापन करण्यास प्रवृत्त केले पाहिजे असे नाही. तर त्यांच्या विविध गरजा स्थानिक पातळीवर पूर्ण करण्यासाठी एक योग्य संरचनाही तयार केली गेली पाहिजे. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था तर मजबूत होईलच शिवाय ग्रामीण भागातून होणारे अनावश्यक स्थलांतर रोखले जाईल. या सर्व विचारांचा मूळ गाभा महात्मा गांधीजींच्या लघु व कुठीर उद्योगांविषयीच्या विचारात सापडतो. जी देशासमोरील आर्थिक सामाजिक समस्या सोडवण्यासाठी या विचारधारेचा आपण उपयोग करून घेऊ शकतो. देशाला मिळालेली ही फार मोठी अमूल्य देणगीच आहे.

## संदर्भ सूची

१. आधुनिक भारताचा इतिहास - प्राचार्य डॉ एस.एस.गाठाळ

२. महात्मा गांधीजींचे सामाजिक आर्थिक व राजकीय विचार - डॉ. रामेश्वर भिसे

३. आर्थिक विचारांचा इतिहास – प्रा. रायखेलकर, डॉ. दामाजी

४. जागतिक आर्थिक विचारांचा इतिहास - डॉ. एस. एम. खंदारे

५. https://www.jansatta.com

६. https://www.livhindustan.com

७. https://www.economicsdiscussion.net

८. खादी और ग्रामीण पुनर्निर्माण: गांधीवादी दृष्टिकोन - डॉ. रवींद्र कुमार, कुरुक्षेत्र मासिक - ऑक्टोबर 2018.